<u>परिपत्रक क्रमांक 282 दिनांक 15/02/1993</u>

विषय :- सार्वजनिक न्यासांच्या निरिक्षणाबाबत

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी या कार्यालयातील व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई या कार्यालयांतील निरिक्षक न्याय लिपिक व सर्व अधिकारी वर्ग यांच्याशी दिनांक 15/2/93 रोजी झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक काढण्यात येत आहे.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक क्रमांक 109 व परिपत्रक क्रमांक 160 मध्ये अंशत: फेरफार करुन असे आदेश देण्यात येत आहेत की, सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा 1950 खालील सार्वजनिक न्यासाच्या निरिक्षणाबाबत सर्व विभागिय व उपविभागिय कार्यालयातील निरिक्षकांनी रुपये 1,00,000/- ( रुपये एक लाख मात्र) पर्यंत उत्पन्न असलेल्या न्यासाचे निरिक्षण करावे.

तसेच रु. 1,00,000/- पेक्षा जास्त उत्पनन असलेल्या न्यासाचे निरिक्षण निरिक्षकांमार्फत करणे आवश्यक वाटल्यास तशा खास सूचना संबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात निरिक्षकांना लेखी दयाव्यात. ज्या न्यासांचे उत्पन्न रु.1,00,000/- पेक्षा जास्त असेल अशा न्यासांचे निरिक्षण सर्व विभागिय अधिकाऱ्यांनी करावे.

क. मो. देसाई
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुंबई
दिनांक 15/2/93